# मंत्रिमंडळ निर्णय

## २८ ऑक्टोबर २०१५

## ( मंत्रिमंडळ बैठक क्र. ५३ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | दुष्काळी भागासाठी पेयजल पाणी पुरवठा संजीवनी योजना | ऊर्जा |
| २ | नागपूर, अमरावती विभागातील नझूल जमिनींच्या भुईभाड्याच्या दरात सुधारणा | महसूल |
| ३ | कृषी संजीवनी योजनेस मुदतवाढ | ऊर्जा |
| ४ | यंत्रमागधारक ग्राहकांना पुरविण्यात येणाऱ्या विजेच्या दरात सुधारणा | ऊर्जा |
| ५ | अस्थायी बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याचा निर्णय | सार्वजनिक आरोग्य |
| ६ | विद्यापीठाचे २०१६-१७ चे बृहत आराखडे सादर करण्यासाठी मुदवाढीचा निर्णय | उच्च व तंत्रशिक्षण |

## दुष्काळी भागासाठी पेयजल पाणी पुरवठा संजीवनी योजना

राज्यातील पाणी पुरवठा योजनांच्या थकीत वीज देयकात सवलत देण्याबाबतची पेय जल पाणीपुरवठा संजीवनी योजना-२०१५ राज्यात जुलै २०१५ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळात घेण्यात आला. पहिल्या टप्प्यात राज्यातील दुष्काळी भागात अटी शिथिल करून ही योजना राबविण्यात येणार आहे.

राज्यातील इतर भागात दुसऱ्या टप्प्यात ही योजना राबविण्यासाठीचे निकष ठरविण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती मार्गदर्शक तत्त्वे तयार करेल. या उपसमितीमध्ये वित्तमंत्री, ऊर्जामंत्री आणि पाणीपुरवठा मंत्री यांचा समावेश असणार आहे.

या योजनेंतर्गत पाणी पुरवठा योजनांना मूळ थकबाकीची ५० टक्के रक्कम एकरकमी किंवा दहा समान मासिक हप्त्यात भरावी लागणार आहे. महावितरण कंपनीतर्फे उर्वरित ५० टक्के व्याज व दंडाची रक्कम माफ करण्यात येणार आहे. या योजनेत सहभागी ग्राहकांनी जुलै २०१५ पुढील बिले निश्चित कालावधीत भरणे आवश्यक आहे. तसेच ८० टक्के पाणीपट्टी वसूली होणे आणि पाणी चोरीचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

पाणीपुरवठा ही अत्यावश्यक नागरी सुविधा असल्याने संबंधित ग्रामपंचायतींना चौदाव्या वित्त आयोगाअंतर्गत त्यांना मिळणाऱ्या निधीतून जिल्हास्तरवरील महावितरण कंपनीस सदर थकबाकीची रक्कम देता येईल. ग्रामविकास विभाग, पाणीपुरवठा विभाग आणि नगर विकास विभाग यांच्या अखत्यारीतील पाणीपुरवठा योजनांबाबतील सुधारीत दरडोई पाणीपट्टी एका महिन्याच्या आत घोषित करावी लागणार आहे.

जून २०१५ अखेर सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांकडे ८८० कोटी रूपये मूळ थकबाकी, ३५२ कोटी ९१ लाख रूपये व्याज व दंडाची रक्कम थकीत आहे. या योजनेपोटी शासनावर ६१६ कोटी ४६ लाख रूपये, महावितरणवर १७६ कोटी ४६ लाख रूपये भार पडणार असून ग्राहकांना ४४० कोटी रूपये भरावे लागतील.

महावितरणतर्फे राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागातील शासकीय, निमशासकीय पाणीपुरवठा योजनांना वीज पुरवठा करण्यात येतो. चालू वीज बिलाचा भरणा केला नसल्याने त्यांचा वीज पुरवठा खंडित केला जातो. यामुळे पाणीपुरवठा योजनांच्या थकबाकीत वाढ होत आहे. राज्यात पडलेला अल्प पाऊस, दुष्काळीसदृश परिस्थिती आणि येत्या उन्हाळ्यात संभावणाऱ्या पाणीटंचाईमुळे हा प्रश्न गंभीर होणार आहे. याबाबत उपाययोजना म्हणून पेय जल पाणीपुरवठा संजीवनी योजना राबविण्यात येणार आहे.

पाणी पुरवठा योजनेच्या थकीत बिलाची कारणे निश्चित करण्यासाठी वित्त विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येणार आहे. ही समिती थकीत वीज बिलांची कारणे सुनिश्चित करण्यासोबतच मार्गदर्शक तत्वे आणि निकष ठरविणार आहे. समिती तीन महिन्यांच्या आत शासनास अहवाल सादर करणार आहे. त्यामुळे येत्या काळात आर्थिकदृष्ट्या यशस्वी होणाऱ्या योजनाच हाती घेण्यात येणार आहे.

-----०-----

## नागपूर, अमरावती विभागातील नझूल जमिनींच्या भुईभाड्याच्या दरात सुधारणा

नागपूर व अमरावती विभागातील नझूल जमिनींच्या भाडेपट्ट्यांचे नूतनीकरण करताना योग्य व समन्यायी दर निश्चित करण्याच्या दृष्टीने बाजारमूल्यावर आधारित दर निश्चित करुन प्रत्येक पाच वर्षाने त्यात बाजारमुल्यानुसार वाढ करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयानुसार सुधारित दर हे विद्यमान दराच्या २० टक्के एवढ्या प्रमाणात असतील.

नागपूर व अमरावती या विभागात निवासी, वाणिज्यिक आणि औद्योगिक प्रयोजनासाठी तत्कालीन मध्य प्रांत आणि वऱ्हाड (सीपी अँड बेरार) भागात लागू असलेल्या कायद्यान्वये मोठ्या प्रमाणात नझूल किंवा शासकीय जमिनी भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या आहेत. या जमिनींपैकी बहुतांश जमिनी या महाराष्ट्राच्या निर्मितीपूर्वीच्या अधिनियमानुसार देण्यात आल्या असून त्यांचे नूतनीकरण त्या भाडेपट्ट्यांत असलेल्या अटी व शर्तीनुसार करण्यात येते.

नझूल जमिनींच्या ज्या भाडेपट्टाधारकांनी २८ डिसेंबर २०११ आणि १ ऑगस्ट २०१४ च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार आपल्या भाडेपट्ट्याचे नूतनीकरण यापूर्वीच करुन घेतले असेल त्यांनाही सुधारित धोरणानुसार भाडेपट्ट्यांचे भुईभाडे सुधारित करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करण्याची मुभा राहणार आहे. या सुधारित भुईभाड्याची वसुली सुधारित भाडे निश्चितीच्या दिनांकापासून करण्यात येणार आहे. मात्र, अशा पद्धतीने सुधारित भुईभाडे ठरविण्यात आलेल्या भाडेपट्टेधारकांना सुधारणेपूर्वी भरलेल्या भाडेपट्ट्याची रक्कम परत मिळणार नाही.

अमरावती व नागपूर विभागातील नझूल जमिनींसंदर्भात २०११ मध्ये सुधारित धोरण निश्चित करण्यात आले होते. या धोरणाची अंमलबजावणी सुकर होण्यासाठी २०१४ मध्ये पूर्वीचे दर कायम ठेवून काही सुधारणा करण्यात आल्या. या सुधारणेमध्ये नझूल जमिनींच्या भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करताना सर्वसाधारणपणे पूर्वीच्या भाड्याच्या तीन पट आकारणी करण्यात येत होती. हे भूईभाड्याचे दर अवाजवी व आवाक्याबाहेरचे असल्याचे मत भाडेपट्टाधारकांनी व्यक्त केले होते. तसेच भाडेपट्ट्यांच्या नूतनीकरणातही उदासीनता दिसून आली होती. त्यामुळे या धोरणात बदल करुन आर्थिकदृष्ट्या परवडेल असे दर निश्चित केल्यास भाडेपट्टा नूतनीकरणास चांगला प्रतिसाद मिळेल, असे जाणवले. त्यानुसार नझूल जमिनींच्या भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करताना त्या-त्यावेळच्या बाजारमुल्यावर आधारित दर निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

नझूल जमिनी या दोन प्रकारे देण्यात आल्या आहेत. त्यामध्ये लिलावाद्वारे परंतु भाडेपट्टा तत्त्वावर आणि केवळ भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या जमिनींचा समावेश आहे. रेडी रेकनरनुसार लिलावाद्वारे परंतु भाडेपट्टा तत्त्वावर देण्यात आलेल्या जमिनींसाठी सुधारित दर पुढीलप्रमाणे असतील. निवासी जमिनींसाठी ०.०२ टक्के, वाणिज्यिक किंवा औद्योगिक वापराच्या एक हजार चौरस फुटापेक्षा कमी जमिनींसाठी ०.०३ टक्के, एक हजार ते तीन हजार चौरस फुटासाठी ०.०४ टक्के, तीन ते पाच हजारासाठी ०.०५ टक्के, पाच हजार चौरस फुटापेक्षा जास्त जमिनीसाठी ०.०६ टक्के आणि धर्मादाय किंवा सार्वजनिक प्रयोजनासाठीच्या जमिनींसाठी ०.०२ टक्के दर आकारण्यात येणार आहे.

भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या जमिनींसाठी सुधारित दर पुढीलप्रमाणे असतील. निवासी जमिनींसाठी ०.०४ टक्के, वाणिज्यिक किंवा औद्योगिक वापराच्या एक हजार चौरस फुटापेक्षा कमी जमिनींसाठी ०.०५ टक्के, एक हजार ते तीन हजार चौरस फुटासाठी ०.०७ टक्के, तीन ते पाच हजारासाठी ०.०९ टक्के, पाच हजार चौरस फुटापेक्षा जास्त जमिनीसाठी ०.१० टक्के आणि धर्मादाय किंवा सार्वजनिक प्रयोजनासाठीच्या जमिनींसाठी ०.०४ टक्के दर आकारण्यात येणार आहे.

-----०-----

## कृषी संजीवनी योजनेस मुदतवाढ

राज्यातील महावितरण कंपनीच्या कृषि ग्राहकांना मदत करण्यासाठी आणि त्यांच्याकडील वीज देयकाच्या थकीत रकमेचा बोजा कमी करण्यासाठी कृषि संजीवनी योजना २०१४ राबविण्यात आली होती. या योजनेस ३१ मार्च २०१६ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

महावितरणचे एकूण ४० लाख ३० हजार कृषि ग्राहक असून यापैकी ३४ लाख १ हजार थकबाकीदार आहेत. त्यांच्याकडे सहा हजार १४० कोटी रूपयांची मूळ थकबाकी आहे. या योजनेनुसार शासनाला ५० टक्के रक्कमेपोटी तीन हजार ७० कोटी रूपये द्यावे लागणार आहे. ३१ मार्च २०१५ पर्यंत या योजनेमध्ये ६ लाख ६७ हजार ग्राहकांनी सहभाग घेतला असून त्यांच्याकडील थकबाकी ९४८ कोटी असून त्यापोटी ३४९ कोटी ७ लाख रूपयांचा भरणा झाला आहे.

या योजनेंतर्गत कृषि ग्राहकांसाठी ३१ मार्च २०१४ पर्यंतच्या मूळ थकबाकी रकमेच्या ५० टक्के रक्कम एकरकमी किंवा तीन मासिक हप्त्यांमध्ये भरल्यास उर्वरीत मूळ थकबाकीच्या ५० टक्के रक्कम शासनाकडून महावितरण कंपनीला अनुदान स्वरूपात देण्यात येणार आहे. तसेच महावितरणतर्फे थकीत असलेले पूर्ण व्याज आणि दंड माफ करण्यात येणार आहे. कृषि संजीवनी योजना सुरवातीला ३१ ऑगस्ट २०१४ पर्यंत राबविण्यात आली. त्यानंतर या योजनेस ३१ ऑक्टोबर २०१४ आणि ३१ मार्च २०१५ अशी दोनदा मुदतवाढ देण्यात आली आहे.

या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी राज्यातील असंख्य कृषि ग्राहकांकडून मुदत वाढवून देण्याची मागणी होत आहे, राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा विचार करून ही मुदतवाढ देण्यात आली आहे.

-----०-----

## यंत्रमागधारक ग्राहकांना पुरविण्यात येणाऱ्या विजेच्या दरात सुधारणा

राज्यातील महावितरण कंपनीच्या लघुदाब यंत्रमाग उद्योगांच्या वीज दरात सूसुत्रता आणण्यासाठी उच्चदाब यंत्रमाग ग्राहकांची वीज दरातील सवलत बंद करून या सवलतीपोटी देण्यात येणारे अनुदान आता लघुदाब यंत्रमाग ग्राहकांच्या अनुदानात समाविष्ट करून सुधारीत दर आकारण्यास आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

शासनाकडून यंत्रमागधारकांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्यात येते. आजच्या या निर्णयामुळे लघुदाब ग्राहकांसाठी असलेल्या सवलतींच्या २.५७ रूपये प्रती युनिट वीजदरात सुमारे ९ पैसे वाढ होऊन उच्च आणि लघुदाब या दोन्ही यंत्रमाग उद्योगांसाठी २.६६ रूपये प्रती युनिट दर आकारण्यात येणार आहे. हे सुधारीत दर १ जून २०१५ पासून लागू करण्यात येणार आहे.

यंत्रमागधारकांना २०१३ पासून सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्यात येत आहे. हे वीज दर महाराष्ट्र वीज नियमक आयोगाकडून निश्चित केले जातात. त्यानंतर १ जून २०१५ मध्ये सुधारीत वीज दर लागू केलेले आहेत. या वीज दरामध्ये २७ अश्वशक्तीच्या आतील लघुदाब यंत्रमागधारकांच्या वीज दरामध्ये २७ अश्वश्क्तीपेक्षा जास्त भार येणाऱ्या यंत्रमाग ग्राहकांच्या दराच्या तुलनेत अधिक वाढ झाली आहे. त्यामुळे लघुदाब यंत्रमागधारकांच्या प्रतिनिधींकडून वीज दरामध्ये सवलत देऊन अनुदानात वाढ करावी, अशी मागणी करण्यात आली होती. त्यानुसार यापुढे उच्चदाब यंत्रमागधारकांना देण्यात येणारी सवलत बंद करण्यात येणार असून २७ अश्वशक्तीपेक्षा कमी आणि जास्त जोडभार असणाऱ्या लघुदाब यंत्रमागधारकांना २.६६ रूपये प्रती युनिट असा समान वीजदर आकारण्यात येणार आहे. या सवलतीच्या दरासोबत उच्चदाब यंत्रमाग तसेच दोन्ही प्रवर्गातील लघुदाब यंत्रमागधारकांना वाढीव स्थिर आकार द्यावा लागणार आहे. तसेच सलवतीच्या दराव्यतिरिक्त इंधन समायोजन आकार किंवा अन्य प्रकारच्या दंडात्मक आकार यंत्रमागधार ग्राहकांनी १०० टक्के भरणे आवश्यक आहे.

वीज दरातील सवलतीमुळे महावितरण कंपनीस होणाऱ्या नुकसान भरपाईपोटी शासनाकडून देण्यात येणारे अनुदान यापुढेही कायम ठेवण्यात आले आहे. भविष्यात वीज नियामक आयोगाने मंजूर केलेला वीजदर यंत्रमागधारकांनी भरणे बंधनकारक करण्यात आले आहे.

-----o-----

सार्वजनिक आरोग्य विभाग

## अस्थायी बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याचा निर्णय

महाराष्ट्र आरोग्य सेवेतील गट-ब संवर्गातील १५ अस्थायी बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांचे गट-अ संवर्गात समावेशन करुन त्यांना कायमस्वरुपी शासन सेवेत सामावून घेण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

या निर्णयानुसार २ फेब्रुवारी २००९ मधील अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या १५ वैद्यकीय अधिकाऱ्यांना याचा फायदा होणार आहे. याअगोदर महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवेतील गट-अ संवर्गातील अस्थायी स्वरुपात कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचे समावेशन करण्यात आले होते. याच धर्तीवर गट-ब मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बाबत निर्णय घेण्यात आला आहे.

-----o-----

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## विद्यापीठाचे २०१६-१७ चे बृहत आराखडे सादर करण्यासाठी मुदवाढीचा निर्णय

नवीन महाविद्यालये, तुकड्या, अभ्यासक्रम, विद्या शाखा (पारंपरिक/व्यावसायिक) इत्यादींचे सन २०१६-१७ या वर्षासाठीचे प्रस्ताव स्विकारण्याची मुदत ३१ डिसेंबर २०१५ पर्यंत वाढविण्यास आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. ही मुदतवाढ करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम ८२(३) मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे.

राज्यभरातील महाविद्यालयांत मागील काही वर्षांत पारंपरिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता व प्रत्यक्षात प्रवेश घेतलेले विद्यार्थी यामध्ये सुमारे २५ टक्के जागा रिक्त असल्याचे निदर्शनास आले. तसेच विद्यार्थी संख्येअभावी व त्यानुसार शिक्षकांची पदे न भरल्याच्या कारणामुळे काही संलग्नित महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्याबाबतच्या विविध याचिका उच्च न्यायालयात दाखल झाल्याचे दिसून आले. उच्च शिक्षणाचा समन्यायी व समतोल लाभ मिळणे अपेक्षित असून त्यादृष्टीने शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी नवीन महाविद्यालये (पारंपरिक, व्यावसायिक), विद्याशाखा, अभ्यासक्रम, वाढीव तुकड्यांच्या प्रस्तावांना मान्यता न देण्याचा शासन निर्णय दिनांक २९ एप्रिल २०१५ नुसार घेण्यात आला आहे. तसेच याच निर्णयानुसार विद्यापीठांनी सुधारित बृहत आराखडे तयार करून ते उच्च शिक्षण परिषदेच्या मान्यतेसाठी सादर करण्याबाबत आदेश देण्यात आले होते. ही मुदत ऑक्टोबरच्या शेवटच्या दिवसापर्यंत होती, ती आता डिसेंबरच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढविण्यात आली आहे.

-----o-----